**प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान वितरीत करण्याबाबतची नियमावली.**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्रमांक : प्रकक्षे/सहाअ२०१२/प्र.क्र.१५१/सांका.४**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**मादाम कामा रोड हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २४ जुलै, २०१२**

**वाचा :** १) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांक जीआए१०७९/४३७५६/का.१२, दि. २२/१/१९८०
२) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक सांकास२००५/प्र.क्र.१२६/ सां.का.३, दि. २८/२/२००६

**प्रस्तावना :-** राज्यातील मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्य करणा-या संस्थांना व संघटनांना सहाय्यक अनुदान देणे या योजनेसंदर्भात संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निधी वितरणाबाबत नियमावली तयार करण्यात आली होती. या नियमावलीप्रमाणे संस्थांकडून प्राप्त होणा-या अर्जानुसार अनुदान देण्याची प्रत्यक्ष कार्यवाही करताना नियमावलीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याचे दिसून आले त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीबाबतचे यापूर्वीचे सर्व शासन निर्णय निरसित करुन सर्वसमावेशक व व्यवहार्य अशी नवीन नियमावली तयार करुन त्यानुसार या योजनेची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचप्रमाणे योजनेचे नावही अधिक समर्पक करण्याच्या दृष्टीने बदल करुन त्यानुसार नव्याने योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :** विचारांती प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान या नांवे सदर शासन निर्णयान्वये नव्याने योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.

**योजनेचे प्रयोजन -** महाराष्ट्रात आज सांस्कृतिक संस्था तसेच इतर क्षेत्रात कार्य करणा-या अनेक संस्थादेखील संस्थेचे मुख्य कार्य सांभाळून सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करणे, कलेचे जतन व संवर्धन यासाठी कार्य करीत आहेत. याद्वारे महाराष्ट्रातील प्रयोगात्मक कला प्रवाहात राहून तिचे जतन व संवर्धन होण्याचे कार्य करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील प्रयोगात्मक कला केवळ शासनामार्फत योजना राबवून टिकवून ठेवणे अभिप्रेत नसून खाजगी संस्थांद्वारे देखील यासाठी कार्य करणे आवश्यक आहे. ही बाब

विचारात घेऊन ज्या खाजगी संस्था प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करीत आहेत त्यांना यासाठी प्रोत्साहन दयावे यास्तव त्यांना या प्रयोजनासाठी सहाय्यक अनुदान देण्याच्या उद्देशाने प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान देण्यात येणार आहे.

**योजनेचे स्वरुप** - प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांनी प्रतिवर्षी सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे अनुदानासाठी विहित नमून्यात सोबत जोडलेल्या नियमावलीनुसार अर्ज केल्यानंतर सदर अर्जांची छाननी करुन नियमावलीतील निकषानुसार अनुदानासाठी पात्र ठरणा-या संस्थांना अर्थसहाय्य समितीच्या मान्यतेने खालीलप्रमाणे एकूण रु. ६५,००,०००/- (रुपये पासष्ठ लाख फक्त) इतके अनुदान वितरीत करण्यात येईल.

**अ) प्रयोगात्मक कलेचे सादरीकरण करणा-या संस्थांना अनुदान :** ज्या संस्था गायन, वादन, नृत्य, नाटक, तमाशा, नकला, कठपुतलीचे खेळ तसेच लोककला या क्षेत्रात सांस्कृतिक कार्यक्रमाचे जनतेसाठी नि:शुल्क सादरीकरण करेल अशा संस्था.

| अ. क्र | अनुदानाची रक्कम | संस्थांची संख्या | एकूण अनुदानाची रक्कम | अनुदानासाठी संस्थेच्या मूल्यांकनाचे निकष |
|---|---|---|---|---|
| १ | रु.५० हजार | ५२ (७ विभाग X ७ संस्था व महाराष्ट्राबाहेरील कार्य करणा-या ३ संस्था) | रु. २६ लाख | संस्थेने ३ वर्षात किमान ३ सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न केले असून त्यासाठी ३ वर्षात मिळून एकूण रु. १ लाख इतका किमान खर्च सांस्कृतिक कार्यक्रमावर केलेला असावा. |
| २ | रु. १ लाख | १६ (७ विभाग X २ संस्था व महाराष्ट्राबाहेरील कार्य करणा-या २ संस्था) | रु. १६ लाख | संस्थेने ३ वर्षात किमान ५ सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न केले असून त्यासाठी ३ वर्षात मिळून एकूण रु. २ लाख इतका किमान खर्च सांस्कृतिक कार्यक्रमावर केलेला असावा. |
| ३ | रु. २ लाख | ४ (संपूर्ण महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील मिळून ४ संस्था) | रु. ८ लाख | संस्थेने ३ वर्षात किमान ७ सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न केले असून त्यासाठी ३ वर्षात मिळून एकूण रु. ४ लाख इतका किमान खर्च सांस्कृतिक कार्यक्रमावर केलेला असावा. |
| | एकूण | ७२ संस्था | रु. ५० लाख | |

**टिप :** राज्यातील ६ महसूली विभाग व मुंबई मध्ये कलाक्षेत्रात कार्य करणा-या संस्थांची संख्या मोठी असल्यामुळे मुंबई हा वेगळा विभाग गृहीत धरुन एकूण ७ विभाग निश्चित करण्यात आले आहेत.

**ब) प्रयोगात्मक कलेचे जतन व संवर्धन करणा-या संस्थांना अनुदान :** ज्या संस्था प्रयोगात्मक कलेचे जतन व संवर्धन करण्यासाठी खालीलप्रकारे कार्य करत आहेत अशा महाराष्ट्रातील ३ संस्थांना प्रत्येकी रु. ५ लाख याप्रमाणे एकूण रु. १५ लाख इतके अनुदान प्रतिवर्षी देण्यात येईल.

१. लुप्त होणा-या कलांचे तसेच आदिवासी कलांचे पुर्नजीवन, सादरीकरण व दस्तऐवजीकरण यासाठी कार्य करत आहेत.

२. दुर्मिळ कलासाहित्य (लिखित व दृकश्राव्य),वांदय व सामुग्री याबाबींचे जतन / संग्रह/प्रदर्शन त्याचप्रमाणे दुर्मिळ ध्वनिमुद्रीकांचे श्रवणसत्र कार्यक्रम आयोजित करण्याचे कार्य करत आहेत.

३. विशेष बालकांसाठी (मतिमंद, अंध, अपंग, मूकबधीर तसेच बालगृह/ निरिक्षण गृहातील बालके) प्रयोगात्मक कलेचे प्रशिक्षण तसेच विशेष बालकांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याचे कार्य करत आहेत अशा संस्था.

४. याव्यतिरिक्त अन्य माध्यमातून प्रयोगात्मक कलेचे जतन व संवर्धन करणा-या संस्था.

**टिप :** प्रयोगात्मक कलेचे जतन व संवर्धन करणे हे आधुनिक काळानुसार अधिक गरजेची बाब असल्यामुळे हे कार्य करणा-या संस्थांच्या या कामाची व्याप्ती पाहून हे अनुदान तसेच संस्थांची संख्या कमी-अधिक करण्याचे अधिकार अर्थसहाय्य समितीस राहतील.

या योजनेसाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिका-यास यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरचा खर्च हा मागणी क्र. झडेडी-२, २२०५ कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०५) (०१) कला व सांस्कृतिक संस्थांना सहाय्यक अनुदान (२२०५ १६२३) - ३१ सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षाखाली त्या त्या आर्थिक वर्षी मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

या शासन निर्णयान्वये या योजनेच्या उपरोक्त लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या आर्थिक तरतुदीच्या मर्यादेतच केवळ नियमावलीत सुधारणा करुन नव्याने योजनेच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात येत असल्यामुळे प्रशासकीय विभागाच्या अधिकारात हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( ख्याती म्हसे - पाटील )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**
**दु. क्र. २७८९९६११**
**इमेल पत्ता :- tca.gom@gmail.com**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित .**
मा. मंत्री (सां.का) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सां.का) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (प. व सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक
उप सचिव (सां.का.४ व समन्वय) यांचे स्वीय सहाय्यक
उप सचिव (व्यय-१४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई (दु.क्र. २२८४२६३४/२२८४२६७०)
(संचालनालयाने सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी)
महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (२ प्रती)
निवड नस्ती, सां.का.४

**शासन निर्णय क्र. प्रकक्षे/सहाअ२०१२/प्र.क्र.१५१/सांका.४,दि.२४ जुलै,२०१२ सोबतचे जोडपत्र**

**प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान देण्याबाबतची नियमावली.**

१. ज्या संस्था जनतेसाठी प्रयोगात्मक कलेचे सादरीकरण (गायन, वादन, नृत्य, नाटक, तमाशा, नकला, कठपुतलीचे खेळ तसेच लोककला यांचे सादरीकरण) नि:शुल्क रित्या करेल अशा संस्था तसेच प्रयोगात्मक कलेचे जतन व संवर्धन करेल अशा संस्था अनुदानासाठी पात्र समजण्यात येतील.

२. प्रयोगात्मक कलेच्या सादरीकरणासंदर्भात राज्यातील प्रत्येक महसूली विभाग व मुंबई विभाग येथील संस्थांना अनुदानासाठी समान प्रतिनिधीत्व मिळण्याची दक्षता घेण्यात येईल.

३. प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांना अनुदान देताना खालील वेळापत्रकानुसार अनुदान वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

**१) जाहिरातीद्वारे अर्ज मागविणे:** सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रतिवर्षी मार्च महिन्यात पुढील आर्थिक वर्षी अनुदान वितरीत करण्यासंदर्भात संस्थांकडून अर्ज मागविण्यासाठी सर्व जिल्हयातील प्रमुख वृत्तपत्रात व्यापक जाहिरात देण्याची कार्यवाही करावी.

**२) संस्थेने अर्ज सादर करावयाचा कालावधी:** वृत्तापत्रातील जाहिरातीनुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या १ एप्रिल ते ३० जून या पहिल्या ३ महिन्याच्या कालावधीतच सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये अर्ज सादर करावा. त्यानंतर प्राप्त होणा-या अर्जांचा त्या आर्थिक वर्षी अनुदान देण्यासाठी विचार केला जाणार नाही. पुढील आर्थिक वर्षी अनुदानासाठी विहित मुदतीत नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

**३) अर्जाची छाननी :** विहित मुदतीत प्राप्त अर्जांची छाननी, छाननी समितीकडून करुन ज्या संस्थांच्या अर्जामध्ये नियमावलीतील निकषानुसार त्रुटी आढळून येतील त्या संस्थांना संधी म्हणून त्रुटी पूर्तता करुन नव्याने अर्ज करण्याबाबत पत्र पाठविणे यासाठी जुलै व ऑगस्ट या २ महिन्यात ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

**४) त्रुटी पूर्ततेचा अहवाल सादर करणे :** सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून त्रुटी पूर्ततेबाबत प्राप्त होणा-या पत्रानुसार त्रुटीची पूर्तता करुन संस्थांनी संचालनालयाकडे दि. ३० सप्टेंबर पर्यंत त्रुटी पूर्तता अहवाल सादर करावा. त्यानंतर प्राप्त होणा-या त्रुटी पूर्तता अर्जांचा त्या आर्थिक वर्षी अनुदान देण्यासाठी विचार केला जाणार नाही.

**५) छाननी समिती व अर्थसहाय्य समितीची बैठक :** संस्थांकडून प्राप्त त्रुटी पूर्तता अर्जांची छाननी समितीने करुन पात्र संस्थांच्या अर्जाबाबत अनुदान वितरीत करण्यासंदर्भात अर्थसहाय्य समितीची बैठक दि. ३१ ऑक्टोबर अखेरपर्यंत घेण्यात येईल.

**६) पात्र संस्थांना अनुदान वाटप करणे :** अर्थसहाय्य समितीच्या मान्यतेने पात्र संस्थांना अनुदान वाटप करण्याबाबत ३० नोव्हेंबर अखेरपर्यंत शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

**७) नव्याने अर्ज मागविणे :** आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस देण्यात आलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त अर्जांची छाननी करुन पात्र संस्थांना अनुदान वितरीत केल्यानंतर जर अर्थसंकल्पिय तरतूद शिल्लक राहिली तर नोव्हेंबर महिन्यामध्ये नव्याने जाहिरात देऊन संस्थांकडून अर्ज मागविण्यात येतील.

४. सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे प्राप्त होणा-या अर्जांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे **छाननी समिती** गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | अध्यक्ष |
| अवर सचिव (सां.का.४), सांस्कृतिक कार्य विभाग | सदस्य |
| सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

५. छाननी समितीने योजनेच्या निकषानुसार पात्र ठरविलेल्या संस्थांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी खालीलप्रमाणे **अर्थसहाय्य समिती** गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| मा. मंत्री (सां.का.) | अध्यक्ष |
| मा. राज्यमंत्री (सां.का) | उपाध्यक्ष |
| प्रधान सचिव (प. व सां.का.) | सदस्य |
| संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

संस्थांना सहाय्यक अनुदान देण्यासंदर्भात तसेच अनुदानाच्या वर्गवारीमध्ये बदल करण्याबाबतचे अधिकार या समितीस असून त्याबाबत ही समिती अंतिम निर्णय घेईल.

६. सहाय्यक अनुदानासाठी अर्ज करणा-या संस्थांनी खालील अटी पूर्ण केल्या पाहिजेत.

१) संस्था नोंदणी अधिनियम आणि सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत असली पाहिजे.

२) संस्थेच्या घटनेत सांस्कृतिक कार्य हा महत्वाचा उद्देश असावा.

३) सहाय्यक अनुदानाकरीता अर्ज करणारी संस्था किमान ३ वर्षापासून कार्यरत असावी.

४) संस्थेने मागील ३ आर्थिक वर्षात प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात केलेले कार्य हे नि:शुल्करित्या केलेले असणे आवश्यक आहे. तसेच त्याद्वारे कोणतेही उत्पन्न मिळविलेले नसावे.

५) संस्थेच्या दरवर्षीच्या हिशोबाची तपासणी धर्मदाय आयुक्तांनी मान्यता दिलेल्या किंवा संमत्ती दिलेल्या परिक्षकाकडून किंवा सनदी लेखापालाकडून (चार्टर्ड अकाऊंटंट) करण्यात यावी. मागील ३ आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणाच्या अहवालाच्या प्रतीत खालील बाबी नमूद केलेल्या असणे आवश्यक आहे.

अ) नफा/तोटा पत्रक

ब) जमा व खर्च लेखे

क) ताळेबंद

ड) प्रयोगात्मक कलेवर केलेल्या खर्चाच्या बाबींचा तपशील

इ) सनदी लेखापालांचे लेखा परिक्षणात्मक अहवाल

७. संस्थेस एकदा अनुदान प्राप्त झाल्यानंतर पुढील ३ वर्षे सहाय्यक अनुदान मिळणार नाही. चौथ्या वर्षी योजनेच्या निकषाच्या आधारे संस्थेच्या अर्जाचा अनुदानासाठी विचार करण्यात येईल.

८. संस्थांनी चुकीची कागदपत्रे सादर करुन सहाय्यक अनुदान प्राप्त केल्याचे आढळून आल्यास सदर संस्था भविष्यात शासनाच्या अनुदानासाठी कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. तसेच सदर संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

९. अर्थसहाय्य देताना संस्थांकडून प्राप्त होणारे अर्ज आणि त्यावर्षी सदर योजनेखाली उपलब्ध असणारी तरतूद विचारात घेऊन खालील संस्थांना अनुदानासाठी प्राधान्य देण्यात येईल.

१. ज्या संस्थांच्या मागील ३ आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालात कोणतेही विपरीत आक्षेप नाहीत, अशा संस्था.
२. ज्या संस्थांच्या मागील ३ आर्थिक वर्षात ज्यांनी विविध नामांकित आणि मान्यताप्राप्त अशा स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविले आहे किंवा त्यांच्या कलावंतांनी गौरव प्राप्त केला आहे, अशा संस्था.
३. ज्या संस्थांच्या मागील ३ आर्थिक वर्षात प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात केलेले कार्य नाविण्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण आहेत, अशा संस्था.
४. ज्या संस्थांनी कलेच्या क्षेत्रात राज्य/देश तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे अशा संस्था.
५. ग्रामीण भागात, आदिवासी दुर्लक्षित भागात आणि औद्योगिक क्षेत्रात कलेचे कार्यक्रम करणा-या संस्थांबाबत प्राधान्याने विचार करण्यात येईल.

१०. संस्थांनी प्रयोगात्मक कलेचे सादरीकरण, जतन व संवर्धन करताना खालील बाबी कटाक्षाने टाळण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

१. जातीय किंवा धार्मिक विद्वेष उफाळून येईल किंवा बळावेल, असे कोणतेही कार्य करता येणार नाही, किंवा असा कोणताही कार्यक्रम सादर करता येणार नाही.
२. शासकीय धोरण किंवा सामाजिक नितिमत्ता यांच्याविरुध्द असलेला कोणत्याही गोष्टीचा आपल्या कार्यात किंवा कार्यक्रमात समावेश करता येणार नाही.
३. विशिष्ट व्यक्तीवर टिका करणारा कार्यक्रम सादर करता येणार नाही.
४. राजकीय वाद किंवा हिंसाचार उद्भवेल किंवा वाढेल असे कार्य किंवा कार्यक्रम सादर करता येणार नाहीत.

११. संस्थांनी प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात मागील ३ वर्षात केलेल्या कार्याचा आढावा घेऊनच या योजनेअंतर्गत त्यांना प्रोत्साहन म्हणून शासनाकडून अनुदान देण्यात येत असल्यामुळे या अनुदानासाठी संस्थांकडून उपयोगिता प्रमाणपत्र मागविण्याची आवश्यकता नाही.

H 1487 (300-7-2012) 3

१२. सदर योजनेअंतर्गत सहाय्यक अनुदानासाठी खालील उपक्रम पात्र धरण्यात येणार नाहीत.

१) रक्तदान शिबीर

२) श्रमदान शिबीर

३) वृक्षारोपण कार्यक्रम

४) दिंडी

५) एडस् जनजागृती

६) पर्यावरण रक्षण

७) क्रिडा स्पर्धा

८) बैलांची शर्यत

९) सत्कार समारंभ

१०) पथनाटय

११) शाळेचे वा महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन

१२) हळदीकुंकू समारंभ

१३) केवळ उदघाटन कार्यक्रमाचे फोटो.

**शासन निर्णय क्र. प्रकक्षे/सहाअ२०१२/प्र.क्र.१५१/सांका.४,दि.२४ जुलै,२०१२ सोबतचा**

## अर्जाचा नमुना

प्रति,

संचालक,सांस्कृतिक कार्य संचालनालय,
१ ला मजला, जुने सचिवालय,
विस्तार भवन, एम. जी. रोड, मुंबई ३२.

प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान या योजनेअंतर्गत हा अर्ज सादर करीत आहोत. या योजनेशी संबंधीत नियमावली आम्ही वाचली असून त्यातील अटी/शर्ती आम्हांला पूर्णत: मान्य आहेत. या योजनेअंतर्गत सहाय्यक अनुदान प्राप्त होण्यासाठी आम्ही अर्ज करीत असून खालीलप्रमाणे संस्थेची व तिच्या कार्यालयाची संक्षिप्त माहिती तसेच त्यासोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडत आहोत.

| अ.क्र | बाब | संस्थेची माहिती |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक, ई-मेल तसेच वेब साईट असल्यास त्याबातची माहिती | |
| २ | संस्थेच्या स्थापनेचे वर्ष | |
| ३ | संस्था नोंदणी अधिनियम/सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी क्रमांक **(संस्थेच्या नोंदणीच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे)** | |
| ४ | संस्थेचे कार्यक्षेत्र (शहरी/ग्रामीण/औद्योगिक/आदिवासी) | |
| ५ | संस्थेचे प्रयोगात्मक कलेमधील कार्याचे उद्दीष्ट (सादरीकरण / जतन/संवर्धन) | |
| ६. | मागील ३ वर्षात संस्थेने कोणत्या कलाक्षेत्रात व कोणत्या स्वरुपाचे कार्य केले आहे त्याबाबत थोडक्यात माहिती **(संस्थेने केलेल्या कार्याबाबत जोडावयाच्या कागदपत्रे ही खालील टिपमधील माहितीनुसार देण्यात यावी.)** | |
| ७ | संस्थेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत कोणते | |
| ८ | मागील ३ आर्थिक वर्षात संस्थेने नामांकित अथवा मान्यताप्राप्त स्पर्धेमध्ये मिळविलेल्या उल्लेखनीय यशाची माहिती. **(त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे)** | |

| | | |
|---|---|---|
| ९ | संस्थेने कलाक्षेत्रात राज्य/देश पातळीवर केलेल्या उल्लेखनीय कामगीरीची थोडक्यात माहिती **(त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे)** | |
| १० | मागील ३ आर्थिक वर्षात केद्र शासन/राज्य शासन यांच्याकडून कलाक्षेत्रातील कार्याबद्दल निधी मिळाला असल्यास त्याबाबतची माहिती (**संबंधीत आदेशाची छायांकित सत्यप्रत**) | |
| ११ | संस्थेला अनुदानासाठी पात्र ठरविल्यास त्यांच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यासाठी संस्थेच्या बँकेचे नाव, ठिकाण, खातेधारकाचे नाव, MICR व IFSC संकेतांक नंबर, पॅनकार्ड नंबर व खाते क्रमांक याबाबतची माहिती | |

**टिप:** मागील ३ वर्षात संस्थेने कोणत्या कलाक्षेत्रात व कोणत्या स्वरुपाचे कार्य केले आहे त्याबाबत माहिती सादर करताना खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे अत्यावश्यक आहे.

१. केलेल्या कार्यक्रमांची मूळ छायाचित्रे **(Original Photoes)** सादर करावीत. छायाचित्रांच्या झेरॉक्स प्रती चालणार नाहीत.

२. संस्थेचे नाव, कार्यक्रमाचे नाव, दिनांक व ठिकाण इ. बाबींचा स्पष्ट उल्लेख असणारा फलक अथवा बॅकड्रॉप कार्यक्रमाच्यामागे लावणे अत्यावश्यक असून कार्यक्रमाच्या मूळ छायाचित्रात सदर फलक असणे आवश्यक आहे.

३. कार्यक्रमाची स्मरणपत्रीका असल्यास तिची प्रत सादर करावी.

४. कार्यक्रमाबाबत मान्यवरांचे अभिप्राय असल्यास त्याची प्रत सादर करावी.

५. कार्यक्रमाशी संबंधीत वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेले वृत्तांत अथवा परिक्षणे (वृत्तपत्राचे नाव आणि वृत्तांताच्या वार व दिनांकासह)

६. कार्यक्रमांच्या निमंत्रणपत्रिका, हँडबील, कार्यक्रमाच्या जाहिरातीचे कात्रण.

७. प्रयोगात्मक कलेचे जतन व संवर्धन करणा-या संस्थांना वरील अनुक्रमांक १ ते ६ येथील कागदपत्रे जोडण्याची आवश्यकता नसून त्यांनी केलेल्या कार्याचे मूळ पुरावे शासनास सादर करावेत.

वरील सर्व माहिती व सोबत प्रमाणित केलेली कागदपत्रे खरी आहेत. वरील माहिती व कागदपत्रे खोटी/चुकीची असल्याची आढळल्यास संस्थेच्या पदाधिका-यांवर कारवाई होऊ शकते याची आम्हाला कल्पना आहे.

अध्यक्ष / सचिव
नाव,पत्ता व स्वाक्षरी